मागच्या जन्मी पाप करणारा नगरसेवक तर महापाप करणारा महापौर होतो

देवेंद्र फडणवीस यांचे वक्तव्य

प्रतिनिधी

पुणे, दि. १७ – मागच्या जन्मी पाप करणारा नगरसेवक तर महापाप करणारा महापौर होतो, असे वक्तव्य विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केले. महापौर मुरलीधर मोहळ नागरी सत्कार समिती कोथरुडच्या वतीने पुणे महापालिकेच्या महापौरपदी मुरलीधर मोहोळ यांची निवड झाली. या कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस बोलत होते.

फडणवीस म्हणाले की, राजकीय जीवनात महापौर आणि नगरसेवक होणे खूप कठीण असते. प्रत्येक गोष्टीसाठी या दोघांनाच जबाबदार धरले जाते. मी देखील महापौर आणि नगरसेवक ही दोन्ही पदे भूषवली आहेत. ज्यांनी मागच्या जन्मी पाप केलं तो नगरसेवक होतो आणि जो महापाप करतो तो महापौर होतो असे फडणवीस म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांच्या या वक्तव्यवर एकच हशा पिकला.

या कार्यक्रमात मोहोळ यांचा माजी मुख्यमंत्री विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार गिरीश बापट, ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले, शिवसेनेचे माजी मंत्री शशीकांत सुतार, शिवसेनेचे माजी आमदार चंद्रकात मोकाटे, काँग्रेस पक्षाचे माजी आमदार रमेश बागवे, मनसेचे नेते बाबू वागसकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी चंद्रकांत पाटील म्हणाले की, आता पैसे वाटप आणि इव्हेंट मॅनेजमेंट करून नेता होता येणार नाही, निवडणुका जिंकता येणार नाहीत अथवा सरकारही चालवता येणार नाही तर लोकांचा विश्वास संपादन करूनच या गोष्टी करता येतील असे सांगत देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या प्रामाणिकपणामुळे लोकांचा विश्वास संपादन केला. दगाफटका झाला नसता तर देवेंद्र फडणवीस यांनी वसंतराव नाईक यांचे रेकॉर्ड तोडले असते अशी स्तुतिसुमने भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील यांनी उधळली.

पाटील म्हणाले, फडणवीस यांना ब्राम्हण समाजाचा म्हणत होते. मात्र त्यांनी अनेक कामे केली, मराठा आरक्षण हेच देऊ शकतात, धनगरांना आरक्षण तेच देऊ शकतात, असा विश्वास त्यांच्याबद्दल निर्माण झाला. अनेक विकासाची कामे करत त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला, असे पाटील म्हणाले.

'सरकारला संवादच नको'

प्रतिनिधी

नागपूर, दि. १७ – देशात ईव्हीएम मशीनने निवडलेले लोक राज्य करीत आहेत. धार्मिक आधारावर सरकार भेद करीत असून धार्मिक तेढ वाढविली जात आहे. देशाच्या संविधानाप्रती या मंडळींना आस्थाच नाही. उद्या हे लोक आपल्या मतदानाच्या अधिकारावरही घाला घालतील. सीएए सारख्या कायद्यावर संवाद होण्याची गरज आहे पण, सरकारला संवादच नको असून या कायद्याद्वारे सर्वांना गुलाम बनविण्याचा डाव आहे, असा घणाघाती आरोप माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील यांनी केला.

महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातून मुंबई–ठाणे येथे स्थलांतरित झालेल्या बेघर भाडोत्री यांना पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून शिरटोन, खोनी, कल्याण येथे हक्काची घरे मिळालीच पाहिजे या मागणीसाठी दुष्काळग्रस्त मराठवाडा विदर्भ – खान्देश नागरी सेवा संघाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्तांनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. (छाया : दीपक कुरकुंडे)

बीएसएनएल बंद पडणार नाही

बीएसएनएलचे अरविंद वडनेरकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

पुणे, दि. १७ – भारत संचार निगम लिमिटेड अर्थात बीएसएनएल बंद पडणार नाही. बीएसएनएल बंद पडणार असल्याचे वृत्त ही अफवा असून केंद्र सरकार बीएसएनएलच्या पाठीशी उभे असल्याचे बीएसएनएल बोर्डाचे मानव संसाधन विभागाचे महासंचालक अरविंद वडनेरकर यांनी सांगितले.

पुण्यामध्ये पत्रकारांशी बोलताना वडनेरकर म्हणाले, बीएसएनएल मधून संपूर्ण भारतातून ७८ हजार ५०० कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली आहे. संपूर्ण भारतात बीएसएनएल चे १ लाख ४९ हजार कर्मचारी होते. त्यामुळे आता ७८ हजार ५०० कर्मचाऱ्यांनी व्हीआरएस घेतली, ३१ जानेवारी २०२० ला या लोकांनी बीएसएनला निरोप असल्याचे सांगत आता या योजनेमुळे बीएसएनएलचा वेतनावरील भार हा तब्बल ७ हजार २०० कोटींने कमी होणार आहे, आणि स्वेच्छा निवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्र सरकार कडून निधी दिला जाणार असल्याने त्याचा भार बीएसएनएलवर पडणार नाही असे ही त्यांनी सांगितले.

एकंदरीतच केंद्र सरकारने बीएसएनएलच्या पुरुज्जीवनासाठी सुचवलेल्या पाच कार्यक्रमांपैकी स्वेच्छा निवृत्ती हा महत्वाचा भाग पूर्ण झाला आहे. तसेच बीएसएनएलच्या जागा विकण्याचा टप्पाही पूर्ण केला जाणार आहे. लवकरच बीएसएनएल पुन्हा प्रगती पथावर येईल असे ते म्हणाले.

एप्रिल २०२० पर्यंत बीएसएनएल ला ४जी स्पेक्ट्रम मिळेल आणि ऑक्टोबर २०२० पर्यंत भारत भरात बीएसएनएल ४जी सुरू होईल असे सांगून ते म्हणाले, बीएसएनएल विकली जाणार हे वृत्त खोटे आहे. केंद्र सरकार बीएसएनलच्या पाठीशी असून व्हीआरएसनंतर आता बीएसएनएलचे पुरुज्जीवन व्हायला सुरुवात झाली आहे

महिलानांही लष्करात समान संधी द्या

सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र सरकारला आदेश

वृत्तसंस्था

नवी दिल्ली, दि. १७ – लष्करातील तुकडीचे नेतृत्व महिलांकडे देण्यासंदर्भात केंद्र सरकारने नकारात्मक भूमिका घेतली होती. या भूमिकेवरून सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला फटकारत दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचे पालन करत महिलानांही लष्करात समान संधी द्या, असे आदेश दिले आहेत.

सैन्यातील तुकडीचे नेतृत्व महिलांकडे (कमांड पोस्ट) देण्यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निकाल दिला होता. लष्करातही महिलांना तुकडीचे नेतृत्व दिलं जावं, असे आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिले होते. या आदेशाला केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या आव्हान याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारचे कान उपटत दिल्ली उच्च न्यायालयानं दिलेल्या आदेशाची अमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंठपीठानं महिलांविषयी घेतलेल्या भूमिकेवरून केंद्र सरकारची कानउघडणी केली. लष्करातही समानता आणावी लागेल. केवळ शारीरिक मर्यादा आणि सामाजिक नियमांमुळे महिलांना समान संधी नाकारता येणार नाही. हे कधीही स्वीकारलं जाणार नाही. केंद्र सरकारने महिलांविषयीची आपली मानसिकता बदलावी आणि दिल्ली उच्च न्यायालयानं महिलांना कमांड पोस्ट देण्यासंदर्भात कायमस्वरूपी कमिशन स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. त्याच पालन केंद्र सरकारनं करावं. तीन महिन्यात केंद्र सरकारने कमिशन स्थापन करावा, अशा शब्दात न्यायालयाने केंद्र सरकारची कानउघडणी केली.

खारघरमध्ये सांस्कृतिक भवन व ग्रंथालय निर्मितीसंदर्भात निवेदन

वार्ताहर

पनवेल, दि. १७ – खारघर सेक्टर ८ मधील भूखंड क्रमांक ९ वर पनवेल महानगरपालिकेच्या राखीव असलेल्या मागासवर्गीय निधीमधून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन व ग्रंथालयाची निर्मिती करण्यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांना सोमवारी निवेदन देण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या जागेवर भव्य वास्तू उभारून सभागृह व ग्रंथालयाची निर्मिती करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

पनवेल महापालिकेच्या येणाऱ्या महासभेमध्ये यासंदर्भातील प्रस्ताव मंजूर करून घेण्याची सूचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर जगदिश गायकवाड व सभागृह नेते परेश ठाकूर यांना दिली.

निवेदन देतेवेळी नगरसेविका आरती नवघरे, भाजप नेते कीर्ती नवघरे, विलास निकम, रमेश तपासे, सनी नवघरे व खारघरमधील नागरिक उपस्थित होते.

निम्नस्वाक्षरीकारांच्या सांगण्यावरून दि सुर्या सीएचएस लि., सचिव/अध्यक्ष इमारत सुर्या सीएचएस लि. मधील फ्लॅट क्र. बी/३०२ मधील १००% शेअर्स, नामाधिकार, हितसंबंध मधील अर्जदार श्री. स्टेन्ली ए. डिसुझा द्वारे सभादत्वाच्या कायदेशीर वारस/नामनिर्देशक/इच्छापत्रधारक च्या तपासणी आणि पडताळणीकरिता याद्वारे सूचना देण्यात येते.

मिळकतीचे परिशिष्ट

सुर्या सीएचएस नावे ज्ञात इमारतीत रहिवासीत परिसर धारक फ्लॅट क्र. बी/३०२, ज्यांचा पत्ता येथे फ्लॅट क्र. बी ३०२, सुर्या अपार्टमेंट्स सीएचएस ५३, भुलाभाई देसाई रोड, कंबाला हिल्स, मुंबई ४०० ०२६.

सर्व/कोणत्याही व्यक्तीस वरील नमूद फ्लॅट क्र. बी/३०२ च्या १००% संदर्भातील अभिहस्तांकन, विक्री, गहाण, वापर, प्रभार, हस्तांतर किंवा त्यांच्या कब्जात मूळ कागदपत्र असल्यास किंवा श्री. स्टेन्ली ए डिसुझा द्वारा एकाला विहित उत्तराधिकार/वारसा च्या मार्गे कोणताही दावा, अधिकार, नामाधिकार किंवा हितसंबंध असल्यास लिखित स्वरूपात निम्नस्वाक्षरीकारांना दाव्यांच्या कागदपत्रीय सत्य प्रमाणित प्रतींसह सदर तारखेपासून सुर्या सीएचएस लि. च्या वरील उल्लेखित पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत कळविणे, अन्यथा दावा त्यागित केल्याचे समजण्यात येईल आणि फ्लॅट क्र. बी/३०२ च्या संदर्भातील १००% शेअर्स करिता अर्जदार सभासद श्री. स्टेन्ली ए डिसुझा द्वारा कायदेशीर वारस दावा ग्राह्य धरण्यात येईल.

आपले विश्वासू
सचिव/अध्यक्ष
सुर्या सीएचएस लि.

दिनांक : १८ फेब्रुवारी, २०२०

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण – १
(भारत सरकार, वित्त मंत्रालय)
२रा मजला, टेलीफोन भवन,
स्ट्रॅन्ड सिनेमा जवळ, कुलाबा, मुंबई–४०० ००५.
टी.ओ.ए. क्र. ४६८ सन २०१६

परि. ६१

इंडियन ओव्हरसीज बँक ...अर्जदार

विरुद्ध

श्री. बुल्लु सिराज सइदअली मुल्ला आणि अन्य ...प्रतिवादी

सूचना

सूचना घ्यावी की, **एमडीआरटी–I** मधील प्रलंबित तुम्ही आणि वरील पक्षकारांच्या दरम्यानच्या **ओ.ए. क्र. ५९ सन २०१०** हा **एमडीआरटी–III** कडून हस्तांतरित करण्यात आला आहे आणि सदर न्यायाधिकरणाच्या फाईलवर **टी.ओ.ए. क्र. ४६८/२०१६** म्हणून नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे तुम्हाला डीआरटी–I यांच्या समक्ष व्यक्तिशः किंवा यथायोग्य माहिती असलेल्या वकिलांमार्फत **२३.०३.२०२०** रोजी दु. **११.३०** वा. हजर राहण्याचे याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत. सूचना घ्यावी की, वरील नमूद दिवशी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरित कार्यवाहीची सुनावणी होईल आणि निर्णय केला जाईल.

माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने **१२ फेब्रुवारी, २०२०** रोजी दिले. सही/–

शिक्का

(अजीत त्रिपाठी)
प्रभारी प्रबंधक
डीआरटी–१, मुंबई

मतिमंद तरुणीवर बलात्कार

गडचिरोली जिल्ह्यातील घटना

प्रतिनिधी

नागपूर, दि. १७ – गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यापासून २२ किलोमीटर अंतरावर असलेल्या गावात पाच नराधमांनी मतिमंद व शारीरिक विकलांग असलेल्या १९ वर्षीय तरुणीवर बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी आरमोरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पाचही आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले. सर्व आरोपींना न्यायालयात पेश करण्यात येणार असल्याची माहिती तपास अधिकारी यांनी दिली.

आरमोरी पोलिस स्टेशनमध्ये दाखल तक्रारीनुसार यातील फिर्यादी महिलेची पुतणी ही मतिमंद व मानसिक विकलांग आहे. मागील एक वर्षाच्या काळात पीडितेच्या शारीरिक व मानसिक विकलांगतेचा गैरफायदा घेत व तिच्यासोबत कोणी नसल्याची संधी साधून पाच नराधमांनी तिच्यावर वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन कधी शेतात तर कधी घरी बलात्कार केला.

या प्रकरणातील आरोपीमध्ये गावातील तीन व बाहेरगावचे दोन असे एकूण पाच आरोपी आहेत. या पाचही आरोपींनी वेगवेगळ्या वेळेस मतिमंद मुलीला एकटे गाठून वेगवेगळी आमिषे दाखवून वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्यावर बलात्कार केला. या प्रकरणाची माहिती कुठे दिली तर जिवानिशी ठार करू, अशी धमकी त्या नराधमांनी पीडितेला दिली होती.

सदर मतिमंद तरुणी ही पाच महिन्याची गरोदर राहिल्याने तिच्या घरच्यांनी तिची वैद्यकीय तपासणी केली असता सदरचा प्रकार उघडकीस आला.

प्रवाशांच्या सतर्कतेमुळे तरुणाचे वाचले प्राण

डोंबिवली, दि. १७ (वार्ताहर) – फलाटाच्या अगदी काठावर उभे राहून लोकल येत असल्याचे पाहताना तोल जाऊन एक तरुण रेल्वे रुळावर पडला. समोरून येणाऱ्या लोकलमधील प्रवाशांनी हे दृश्य पाहताच लोकलमधील चैन ओढली. त्यामुळे लोकल थांबल्याने त्याचा जीव वाचला. बदलापूर येथे राहणारा गौरव लाड शनिवारी रात्री पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास डोंबिवली स्टेशनवरील फलाट क्रमांक ४ वर बदलापूरच्या दिशेने जाणाऱ्या लोकलची वाट वाट पाहत उभा होता. फलाटाच्या अगदी काठावर उभा असताना अचानक तोल जाऊन अचानक तो रुळावर पडला. यावेळी समोरून लोकल येत होती. थांबवली.

जाहीर सूचना

जेसन्स टेक्नो पॉलीमर्स एलएलपी

नोंदणीकृत कार्याल : ९०४, ९ वा मजला, १, पेनिन्सुला कॉर्पोरेट पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, डिलाइल रोड, मुंबई – ४०० ०१३, महाराष्ट्र भारत.

मर्यादित दायित्व भागीदारी नियम, २००९ च्या नियम १७ व मर्यादित दायित्व भागीदारी कायदा, २००८ च्या अनुच्छेद १३ अंतर्गत सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, जेसन्स टेक्नो पॉलीमर्स एलएलपी (एलएलपी) मर्यादित दायित्व भागीदारी कायदा, २००८ च्या अनुच्छेद १३(१३) अंतर्गत व मर्यादित भागीदारी नियम, २००९ सहवाचन अंतर्गत महाराष्ट्र, कंपनीचे निबंधक **महाराष्ट्र** राज्यामधून **गुजरात** राज्यामध्ये त्यांचे नोंदणीकृत कार्यालय बदलण्याच्या सुधारणा करण्यात आलेल्या सक्षम करण्याकरिता याचिकाकर्ते एलएलपी यांच्या हुद्दा भागीदार यांच्या सभेमध्ये दि. १७ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या ठराव मंजूर एलएलपीच्या व्यवहारांऐवजी सुधारणांची पुष्टी करण्याकरिता याचिकाकर्ते यांच्या समक्ष दाखल करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्यामधून **गुजरात** राज्यामध्ये सदर एलएलपी चे नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित बदलाद्वारे कोणाही व्यक्तीच्या हितास बाधा येत असल्यास त्यांनी त्यासंदर्भात आपल्या हिताचे स्वरूप व सूचनेस विरोधाची पार्श्वभूमी, काही असल्यास, त्यासमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत कंपनीचे निबंधक, मुंबई येथे, ५ वा मजला, १००, मरिन ड्राईव्ह, मुंबई, महाराष्ट्र – ४०० ००२ येथे एलएलपी संबंधात असलेले दावे येथे सूचित करावे. हरकती काही असलयास त्यांसमवेत प्रतिज्ञापत्र सादर करावे व एक प्रत एलएलपीच्या वरील निर्देशित नोंदणीकृत कार्यालयात पाठवावी.

जेसन्स टेक्नो पॉलीमर्स एलएलपी यांच्या वतीने व त्यांच्याकरिता
सही/–
धिरेश शशीकांत गोसालिया
हुद्दा भागीदार
डीपीआयएन : ००२१७१५८

ठिकाण : मुंबई
दि. १८ फेब्रुवारी, २०२०

DHFL Changing Rules Changing Lives

दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड

राष्ट्रीय कार्यालय: डीएचएफएल, एचडीआयएल टावर्स, बी विंग, ६वा आणि ८वा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू.), मुंबई–४०० ०५१.
झोनल कार्यालय: डीएचएफएल, २०८–२१२, २रा मजला, टरकॉईस बिल्डिंग, पंचवटी, क्रॉस रोडस्, सी. जी. मार्ग, अहमदाबाद–३८० ००९.

जोडपत्र IV कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड (डीएचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता नियम ८ आणि ९ सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून कंपनीच्या अधिकाऱ्यांद्वारे निर्गमित मागणी सूचना जारी करून खालील नमूद कर्जदार/हमीदार यांस सूचनेत नमूद करण्यात आलेल्या रकमेची परतफेड सूचनेच्या तारखेच्या **६० दिवसांत** करण्यास सांगितले होते. रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार, हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा कब्जा त्यांना सदर ॲक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर रुल्सच्या नियम ८ आणि ९ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून घेतला. विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी व्यवहार करू नये व मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा **डीएचएफएल** यांस खालील नमूद रक्कम आणि व्याजासाठी भाराअधीन राहील.

कर्जदार(रां)/हमीदार(रां)चे नाव	तारण मत्तेचे वर्णन (स्थावर मिळकत)	मागणी सूचना तारीख आणि रक्कम	कब्जाची तारीख
(एलसी क्र. ०००४३४६२/ दहिसर शाखेचा) प्रकाश दिपक बॅनेर्जी (कर्जदार) ज्योती दिपक बॅनेर्जी (सह–कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग:– फ्लॅट क्र. ०४, तळ मजला, श्रृती ३ आनंद पार्क सीएचएसएल, निळेमोरे रोड, आदीराज सीएचएसएल जवळ, नालासोपारा पश्चिम, ठाणे– ४०१२०९	२५.०१.२०१९, रु. २१,६०,९४५/– (रुपये एकवीस लाख साठ हजार नऊशे पंचेचाळीस मात्र)	१२.०२.२०२०
(एलसी क्र. ०००००४९३/ उल्हासनगर शाखेचा) गुरबिंदर कौर बलवंतपाल सिंग मारवाहा (कर्जदार) बलवंतपाल सिंग मारवाहा (सह–कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग:– फ्लॅट क्र. ३०२, ३रा मजला, साई समृद्धी अपार्टमेंट वॉटर सप्लाय कार्यालय, स्टेशन जवळ, उल्हासनगर पूर्व, ठाणे– ४२१००४	२३.०४.२०१९, रु. २३,९१,६१३/– (रुपये तेवीस लाख एक्याण्णव हजार सहाशे तेरा मात्र)	१४.०२.२०२०
(एलसी क्र. ०००००८९६२/ कल्याण शाखेचा) सिद्धार्थ बी क्षेत्रे (कर्जदार) उषा बालू क्षेत्रे, ममता सिद्धार्थ क्षेत्रे (सह–कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग :– फ्लॅट क्र. २०१, २रा मजला, डी विंग, नेप्च्युन, रतन गॅलेक्सी, पाटील पेट्रोल पंप मागे, बेलवली बदलापूर पश्चिम, ठाणे, महाराष्ट्र– ४२१५०३	२८.०८.२०१९, रु. २९,५०,७५८/– (रुपये एकोणतीस लाख पन्नास हजार सातशे अठ्ठावन्न मात्र)	१४.०२.२०२०
(एलसी क्र. ०००००२०२५/ भांडुप शाखेचा) कैलाश बाबुराव कोडाग (कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग :– फ्लॅट क्र. ४०१, ४था मजला, डी विंग, गोपाल नगर, सीडीई विंग, सीएचएसएल, कर्जत रोड लगत, गोपाल नगर, बदलापूर (पूर्व), ठाणे– ४२१५०३	२८.०८.२०१८, रु. ७,७५,९२३/– (रुपये सात लाख पंच्याहत्तर हजार नऊशे तेवीस मात्र)	१४.०२.२०२०
(एलसी क्र. ०००००२२२३/भांडुप शाखेचा) साजिद हुसैन (कर्जदार) उषा बालू क्षेत्रे, शभाना फातिमा साजिद हुसैन, लईक आय रिझवी (सह–कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग :– फ्लॅट क्र. ३०४, ३रा मजला, इमारत क्र . ७२ पोद्दार हाऊसिंग समृद्धी एव्हरग्रीन सपे जवळ, गाव बदलापूर, कर्जत रोड, बदलापूर पू. ठाणे, महाराष्ट्र– ४२१५०३	२६.०७.२०१९, रु. १९,२६,५२१/– (रुपये एकोणीस लाख सव्वीस हजार पाचशे एकवीस मात्र)	१४.०२.२०२०
(एलसी क्र. ०००००३८३८/ ठाणे शाखेचा) मकसूद मुख्तार शेख (कर्जदार) सलमा मकसूद शेख (सह–कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग :– फ्लॅट क्र. १०१, १ला मजला, विंग ए, इमारत क्र. १२०, क्रांती करम रेसिडेन्सी, सेक्टर–४, धसई, शहापूर किन्हवली रोड, शहापूर, ठाणे– ४२१६०१	२५.०६.२०१९, रु. ७,११,२१९/– (रुपये सात लाख अकरा हजार दोनशे एकोणीस मात्र)	१४.०२.२०२०
(एलसी क्र.०००३२११८/ मुंबई मेट्रो शाखेचा) प्रेमचंद देवजी छाभैया (कर्जदार) रमिलबेन भगवानजी ढोलू (सह–कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग :– फ्लॅट क्र. युनिट क्र. १२१, १ला मजला, ग्लोबल इस्टेट डोंबिवली इंडस्ट्रीयल इस्टेट, प्लॉट क्र. सी–९ कल्याण शीळ रोड, डोंबिवली पूर्व ठाणे, ठाणे, महाराष्ट्र– ४२१२०४	२९.१०.२०१९, रु. ४३,९९,५८०/– (रुपये त्रेचाळीस लाख नव्याण्णव हजार पाचशे ऐंशी मात्र)	१४.०२.२०२०
(एलसी क्र.०००३३१८५/ मुंबई मेट्रो शाखेचा) राहुल आय. पुरी (कर्जदार) इंदरपाल एस. पुरी (सह–कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग :– फ्लॅट क्र. २०३, २रा मजला, आय विंग, टाईप डी सनसिटी कॉम्प्लेक्स, मनोर पोलिस स्टेशन जवळ, पालघर मनोर रोड, मनोर गाव, पालघर पूर्व, ठाणे, महाराष्ट्र– ४०१४०४	१८.०२.२०१९, रु. १०,७७,७९०/– (रुपये दहा लाख सत्त्याहत्तर हजार सातशे नव्वद मात्र)	१४.०२.२०२०
(एलसी क्र. ०००००८८८३/नवी मुंबई शाखेचा) तुषार मनसुखलाल मेहता (कर्जदार)त्रिशना राजीव पटनी, योगेश मनसुखलाल मेहता (सह–कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग :– कार्यालय क्र. २०३, २रा मजला, विंग ए, क्लासिक पेटगाव, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे बिसलेरी कंपनी जवळ, अंधेरी पूर्व, मुंबई, मुंबई उपनगर, महाराष्ट्र– ४०००६९	२६.०९.२०१९, रु. २,१६,३२,३६२/– (रुपये दोन करोड सोळा लाख बत्तीस हजार तीनशे बासष्ट मात्र)	१४.०२.२०२०
(एलसी क्र. ०००००२५८/ विरार पूर्व) सावरिया टेक्सटाईल्स (कर्जदार) ब्रम्हदत्त बनारसीलाल अगरवाल, सुनिल ब्रम्हदत्त अगरवाल (सह–कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग :– फ्लॅट क्र. ६०३, ६वा मजला, बी/४, फेज II, मानसरोवर कॉम्पलेक्स, फेने गाव, मानसरोवर लेक भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र– ४२१३०२	३०.०७.२०१९, रु. २०,३१,०५३/– (रुपये वीस लाख एकतीस हजार त्रेपन्न मात्र)	१५.०२.२०२०
(एलसी क्र. ०००००९९९/ कर्जत) जयेश बालू घरत (कर्जदार) श्रीम. रेश्मा जयेश घरत (सह–कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग :– फ्लॅट क्र. २०३, २रा मजला, वैभव अपार्टमेंट, एचपी पेट्रोल पंप समोर, दहिवली कर्जत, रायगड, महाराष्ट्र– ४१०२०१	२५.०१.२०१९, रु. २२,६४,०२८/– (रुपये बावीस लाख चौसष्ट हजार अठ्ठावीस मात्र)	१५.०२.२०२०
(एलसी क्र. ०००००६१५/ घाटकोपर) विनोद गोविंद राजपूत (कर्जदार) रूकसार सुल्तान सय्यद (सह–कर्जदार)	धारक मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग :– फ्लॅट क्र. २०३, २रा मजला, इमारत क्र. १०, विंग डी, साई मोरेश्वर फेज II, वंजारपाडा, स्पेस सिटी जवळ, नेरूळ कर्जत, रायगड, रायगड– ४१०१०१	२४.१०.२०१८, रु. २६,४२,५३३/– (रुपये सव्वीस लाख बेचाळीस हजार पाचशे तेहेतीस मात्र)	१५.०२.२०२०

सही/–
(प्राधिकृत अधिकारी)
दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड

दिनांक: १८.०२.२०२०
ठिकाण: मुंबई

INVITATION FOR EXPRESSION OF INTEREST (EOI)
FOR SALE OF LAND and PLANT / ASSETS OF COMPANY
OF GUPTA ENERGY PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION) GHUGHUS, CHANDRAPUR

In furtherance of liquidation proceeding of Gupta Energy Pvt Ltd (Commenced vide NCLT order in CP no. 43/IB/NCLT/MAH/2017 dated 26th March 2018, interalia appointing the undersigned as a Liquidator). The Liquidator, in terms of section 35(1) (f) of Insolvency and Bankruptcy Code, 2016 read with Regulation 33 of IBBI (Liquidation Process) Regulations 2017, invites expression of interest for sale of assets of the company on 'as is where is and whatever there is basis,

Sr. No.	Assets in Parcel	Reserved Price (Rs. in Lacs)	EMD Amount (Rs. in Lacs)
1	Factory Land (144.51 Acres), Building, Power Plant & Machineries - 60x20 (MW) and other Assets	6000.00	30.00
2	Land Other than Factory Land (232.72 Acres)	3250.00	16.25

Interested Applicants may submit EOI for sale of Plant / Assets of Company along with prescribed EMD fee in terms of the invitation. For detailed terms and conditions of the EOI. Visit **https://eauction.npasource.com** or send email at **liquidator.gepl@gmail.com**

Other Points :

1. E Auction will be conducted on "AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS" and "WHATEVER THERE IS BASIS" through approved service provider, **(https://eauction.npasource.com/)**.
2. This Sale Notice shall be read in conjunction with the E-Auction Process Document containing Breif of the Assets, online E Auction Tender Form, Deed of Indemnity, General Terms & Conditions of E-Auction Sale which are available on website **https://eauction.npasource.com** or through mail **liquidator.gepl@gmail.com**, Contact Number +91-9860128856.
3. E Auction documents should reach the office of the Liquidator Physically or by Email, at the address : Level 3, Leela Vista Building, West High Court Road, Bajaj Nagar, Nagpur 440010 before 5.00 PM on 27th February 2020.
4. E-Auction will be start from at **3.00 PM to 5 PM IST 28th February 2020**

Vikas Prakash Gupta
Liquidator
(Gupta Energy Private Limited - under Liquidation)
Registration No : IBBI/IPA-001/IP-P00501/2017-18/10889

Date : 18.02.2020
Place : Nagpur

तेलंगणातील अपघातात सोलापुरातील तीन ठार

तीन जण गंभीर तर सातजण किरकोळ जखमी

प्रतिनिधी

सोलापूर, दि. १७ – तिरुमला येथील तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी निघालेल्या सोलापुरातील दोन कुटुंबियांच्या वाहनाला भीषण अपघात होऊन तीनजण जागीच ठार, तीनजण गंभीर तर सातजण किरकोळ जखमी झाल्याची घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास तेलंगणातील कोत्ताकोटा गावाजवळ घडली.

सोलापुरातील प्रसिद्ध गणित शिक्षक यल्लप्पा पेंटप्पा धुळम आणि कुनी परिवारातील जवळपास १३ जण खाजगी वाहनाद्वारे रविवार पहाटेच्या सुमारास तिरुपती बालाजीच्या दर्शनाला निघाले होते. रविवारी सायंकाळी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील वानपरसी जिल्ह्यातील कोत्ताकोटा गावाजवळ त्यांच्या भरघाव वाहनाने एका पुलाच्या संरक्षक कठड्याला धडकून भीषण अपघात झाला. चालकाने अतिवेगाने वाहन चालवून पुलाच्या कठड्याला जोराची धडक दिल्याने हा भीषण अपघात घडल्याचे समोर आले आहे. या अपघातात स्वप्ना राजू कुनी (वय २५), शारदा कृष्णहरी कुनी (वय ४५, दोघे राहणार, जोडभावी पेठ सोलापूर) आणि [illegible] पेंटप्पा धुळम (वय ४७, राहणार,जोडभावी पेठ, सोलापूर) हे तिघेजण जागीच ठार झाले. तर गणित शिक्षक यल्लप्पा पेंटप्पा धुळम (वय ६२, राहणार जोडभावी पेठ,सोलापूर), कृष्णहरी कुनी (वय ५०) आणि शिवा असे तिघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर हैद्राबाद येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत